

आर्थिक वर्ष २०२२-२३ व आर्थिक वर्ष २०२३-२४ यांचे आर्थिक समायोजन आणि आर्थिकवर्ष २०२४-२५ चे हंगामी आर्थिक समायोजन यांचा, तसेच आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिकवर्ष २०२९-३० चा एकूण आवश्यक महसूल व बहुवर्षीय वीजदर यासाठी अदाणी पॉवर लि. (एपीएल) ची याचिका.

कार्यकारी सारांश (अदाणी डहाणू औष्णिक उर्जा केंद्रासाठी)

अनुक्रमणिका.

१. परिचय व संक्षिप्त माहिती... पान क्रमांक दोन

१.१ अदाणी डहाणू ऊर्जा निर्मिती केंद्राची ( एडीटीपीएस ) मालकी अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड (एईएमएल) कडून अदाणी पॉवर लिमिटेड कडे..... पान क्रमांक दोन

२. आर्थिक वर्ष २०२२-२३ आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ यांचे आर्थिक समायोजन आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ चे हंगामी आर्थिक समायोजन ...... पान क्रमांक चार

२.१ आर्थिक वर्ष २०२२-२३ आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ मधील परिचलन कामगिरी....पान क्रमांक चार

२.२ आर्थिक वर्ष २०२२-२३, आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ यांचे ऊर्जा शुल्क..... पान क्रमांक चार

२.३ आर्थिक वर्ष २०२२-२३ आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ यांचे स्थिर शुल्क.... पान क्रमांक चार

२.४ आर्थिक वर्ष २०२२-२३ आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ यांची महसुली तूट / ( अधिक्य ) तसेच आर्थिक वर्ष २०२४-२५ ची हंगामी महसुली तूट / ( अधिक्य ) पान क्रमांक पाच

३. आर्थिक वर्ष २०२५-२६ पासून ते आर्थिकवर्ष २०२९-३० पर्यंत एकूण महसुलाची आवश्यक्ता..पान क्र. आठ

३.१ आर्थिक वर्ष २०२५-२६ पासून ते आर्थिकवर्ष २०२९-३० पर्यंतचे परिचालनाचे मापदंड..पान क्र. आठ

३.२ आर्थिक वर्ष २०२५-२६ पासून ते आर्थिकवर्ष २०२९-३० पर्यंतचे उर्जा आकार..पान क्र. आठ

३.३ आर्थिक वर्ष २०२५-२६ पासून ते आर्थिकवर्ष २०२९-३० पर्यंतचे स्थिर आकार..पान क्र.आठ

४. मागण्या...... पान क्रमांक दहा

## १. परिचय व संक्षिप्त माहिती -

एम वाय टी विनियम २०२४ च्या नियम ५.१ **(**ए) नुसार सादर करावयाच्या बहुवार्षिक वीजदर निश्चिती मागणीच्या अर्जात खालील बाबींच्या समावेशाची तरतूद आहे.

१. आर्थिक वर्ष २०२२-२३ आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ चे आर्थिक समायोजन एमईआरसी (बहुवार्षिक वीजदर) नियम २०१९ नुसार करावी.

२. आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या हंगामी आर्थिक समायोजनाची प्रक्रिया एम वाय टी नियम २०१९ च्या आधारे करावी.
३. एकूण महसुलाच्या आवश्यकतेचा (एआरआर), तसेच पाचव्या नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षाचे स्थिर आकार आणि उर्जा आकार यांचा अंदाज वर्तवणे.

एमआयटी विनियम २०२४ मधील तरतुदींनुसार आर्थिक वर्ष २०२२-२३ आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ यांचे आर्थिक समायोजन तसेच आर्थिक वर्ष २०२४-२५ चे हंगामी आर्थिक समायोजन करण्यासाठी तसेच आर्थिक वर्ष २०२५-२६ पासून ते आर्थिक वर्ष २०२९-३० पर्यंतच्या एकूण आवश्यक महसुलाचा अंदाज वर्तविण्यासाठी हा अर्ज सादर केला आहे.

१.१ अदाणी डहाणू औष्णिक ऊर्जा निर्मिती केंद्राची ( एडीटीपीएस ) ची मालकी अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड ( एईएमएल ) कडून अदाणी पॉवर लिमिटेड कडे गेली.

५०० मेगावॉट वीज निर्मिती क्षमतेची (२५० मेगावॉट ची दोन संयंत्रे) एडीटीपीएस १९९५ मध्ये स्थापन झाली आणि ती, एईएमएल चा एक भाग आहे. संसाधन व्यवस्थापन सुधारण्यासाठी तसेच एडीटीपीएस कडून परिणामकारक वीज पुरवठा व्हावा म्हणून एडीटीपीएस ची मालकी अदाणी ग्रुपच्या दुसऱ्या कंपनीकडे म्हणजेच अदाणी पॉवर लिमिटेड कडे जावी असा निर्णय २४.०७.२०२४ च्या एईएमएल च्या संचालक मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. ३० सप्टेंबर २०२४ रोजी ही मालकी बदलण्याची प्रक्रिया झाली. एपीएल कडे मोठ्या संख्येने ऊर्जा निर्मिती मालमत्तेची मालकी आणि संचालन असल्याने (एकूण संचालित स्थापित क्षमता १५,८५० मेगावॉट आणि निर्माणाधीन स्थापित क्षमता २,९५० मेगावॉट) एडीटीपीएस ची मालकी घेण्यास आणि तिचे संचालन करण्यास एपीएल योग्य असल्याचे म्हणणे आहे आहे. एईएमएलची ई.एस.जी (पर्यावरण सामाजिक आणि प्रशासन) विषयक कर्तव्ये पार पाडण्यासाठी देखील एडीटीपीएस च्या मालकीचे हस्तांतरण आवश्यक होते. एडीटीपीएस च्या मालकीचे हस्तांतरण झाल्यानंतर एईएमएल-डी आणि एपीएल यांनी मा. आयोगासमोर अर्ज सादर करून अदाणी पॉवर लि. ची मालकी आणि संचालन असलेल्या एडीटीपीएस च्या वीज खरेदी कराराला (पी.पी.ए.) मंजुरी देण्याची मागणी आयोगाकडे ( अर्ज क्रमांक १५४/२०२४) केली होती. एडीटीपीएस कडून वीजपुरवठा घेण्यासाठीच्या एइएमएलडी आणि अदाणी पॉवर यांच्यातील वीज खरेदी कराराचा कालावधी मार्च २०२५ पर्यंत आहे. एईएमएल-डी ने देखील यासंदर्भात तातडीने सुनावणी व्हावी यासाठी अर्ज ( आयए क्रमांक ४७/२०२४ ) केला आहे. त्यावर २० सप्टेंबर २०२४ रोजी सुनावणी झाली. आयोगाने २० सप्टेंबर २०२४ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशानुसार एपीएल ची मालकी आणि संचालन असलेल्या एडीटीपीएस कडून वीज खरेदी करण्यास एईएमएल-डी ला परवानगी देण्यात आली आहे. या अंतरिम आदेशातील महत्त्वाचा सारांश खालील प्रमाणे आहे.

***४. यानुसार एपीएल ही नवी मालक कंपनी संचालन करीत असलेल्या एडीटीपीएस कडून एईएमएल-डी आणि एईएमएल-जी यांच्यातील सध्याच्या वीज खरेदी करारानुसारच, याप्रकरणीच्या पुढील आदेशापर्यंत वीज खरेदी करण्यास एईएमएलडी ला परवानगी देण्यात येत आहे. मात्र यामुळे त्यांच्या सध्याच्या ग्राहकांवर, वीजपुरवठा आणि त्याचे शुल्क यासंदर्भात कोणताही विपरीत परिणाम होता कामा नये. तसेच अन्य कोणतेही दुष्परिणाम होता कामा नयेत ही प्रमुख अट आहे.***

ए पी एल चे म्हणणे आहे की, आयोगाने वीज कायदा २००३ च्या कलम ६२ नुसार निश्चित केल्याप्रमाणे वीजपुरवठा आणि/किंवा त्याचे शुल्क यावर कोणताही प्रतिकूल परिणाम होणार नाही. कारण हे वीज शुल्क, वेळोवेळी असलेल्या एमवायटी विनियमांच्या अटीनुसार, आयोगाने मंजूर केलेल्या नियमबद्ध मालमत्तेच्या आधारे मा. आयोगामार्फत ठरवले जाईल.

**२. आर्थिक वर्ष २०२२-२३ आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ यांचे आर्थिक समायोजन तसेच आर्थिक वर्ष २०२४-२५ चे हंगामी आर्थिक समायोजन.**

**२.१ आर्थिक वर्ष २०२२-२३ आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ मधील परिचालनाची कामगिरी.**
आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी ए डी टी पी एस ने ७९.८८ % एवढे पी एल एफ मिळवले आहे. तसेच उपलब्धतेची ( अव्हेलेबिलिटीची ) टक्केवारी ९५.८३ एवढी आहे. नॉर्मेटीव्ह ॲन्यूअल प्लांट अव्हेलेबिलिटी फॅक्टर (एनएपीएएफ) हा एमआयटी नियम २०१९ मध्ये ८५ % नोंदवण्यात आला आहे. त्यापेक्षा ही कामगिरी चांगली आहे. तसेच आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी एडीटीपीएसने ७३.९६ % एवढा पी एल एफ मिळवला असून अव्हेलेबिलिटी ९१.०३ % आहे. ही कामगिरी, एमवायटी विनियम २०१९ मध्ये नमूद केलेल्या ८५ टक्के एन ए पी ए एफ पेक्षा जास्त आहे. कामगिरीच्या इतर निकषांचा विचार करता एडीटीपीएस ची कामगिरी आर्थिक वर्ष २०२२-२३ आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ मधील बहुतांश निकषांपेक्षा चांगली आहे. २०२४-२५ या वर्षात एपीएल ने सप्टेंबर २०२४ पर्यंत निर्माण केलेली प्रत्यक्ष ऊर्जा विचारात घेऊन तसेच ७५ % पीएलएफ विचारात घेऊन आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या उरलेल्या सहा महिन्यांसाठी किती ऊर्जानिर्मिती होईल त्याचा अंदाज व्यक्त केला आहे. ए डी टी पी एस ला वार्षिक ७५ % च्या आसपास पीएलएफ मिळत असल्याने त्या आधारेच हा अंदाज केला आहे. कामगिरीचे अन्य निकष नेहमीच्याच मानकांच्या पातळीवर विचारात घेतले आहेत.

२.२ आर्थिक वर्ष २०२२-२३ आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ साठीचे ऊर्जा शुल्क.

एपीएल ने आर्थिक वर्ष २०२२-२३ आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ चे ऊर्जाशुल्क निश्चित करताना इंधनाची प्रत्यक्ष किंमत आणि एमआयटी नियम २०१९ मध्ये नमूद केलेल्या मानकांच्या निकषांचे मूल्य विचारात घेतले आहे. तर आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी ऊर्जाशुल्क निश्चित करताना ए पी एल ने सप्टेंबर २०२४ पर्यंत केलेली निव्वळ ऊर्जानिर्मिती विचारात घेतली आहे. तसेच त्या आधारेच आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील उरलेल्या सहा महिन्यांचा अंदाज वर्तवला आहे. या आर्थिक वर्षाच्या पुढील सहा महिन्यांसाठी अंदाज काढताना जी.सी.व्ही. आणि कोळशाची किंमत ही या आर्थिक वर्षाच्या (२०२४-२५) पहिल्या सहामाहीत जेवढी होती तेवढीच अंदाजीत धरण्यात आली आहे.

२.३ आर्थिक वर्ष २०२२-२३ आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ यांचे स्थिर शुल्क.

ए पी एल ने आर्थिक वर्ष २०२२-२३, आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ साठीचे स्थिर शुल्काचे घटक, एमवायटी नियम २०१९ नुसार निश्चित केले आहेत. ए पी एल ने आर्थिक वर्ष २०२२-२३ आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ चे नेहमीच्या मानकांनुसारचे परिचलन आणि देखभाल खर्च एमवायटी विनियम २०१९ नुसार निश्चित केले आहेत आणि प्रत्यक्ष संचालन आणि देखभाल खर्चाशी त्यांची तुलना करून परिचलन आणि देखभाल खर्चाची नेमकी रक्कम काढली आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी परिचलन आणि देखभाल खर्च अंदाजे निश्चित करताना एम वाय टी नियम २०१९ नुसार नेहमीच्या निकषानुसार नियमित मानकांचा आधार घेतला आहे.

ए पी एल ने आर्थिक वर्ष २०२२-२३ आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ मधील प्रत्यक्ष भांडवलीकरणाचा विचार करून एमवायटी विनियम २०१९ नुसार वरील दोन आर्थिक वर्षांसाठीचा घसारा निश्चित केला आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी घसाऱ्याचा दर निश्चित करताना एपीएल ने एमवायटी नियम २०१९ मध्ये निश्चित केलेल्या दरानुसार आर्थिक वर्ष २०२४-२५ चे अंदाजित भांडवलीकरण विचारात घेतले आहे.

कर्जावरील व्याज आणि समभागांवरील परतावा ( लागू कर आकारणी लक्षात घेऊन ) निवश्चित करताना एमवायटी विनियम २०१९ मध्ये नमूद केलेल्या कर्ज भांडवल प्रमाणाच्या (डेट इक्विटी रेशो) नेहमीच्या निकषांचा विचार केला आहे.

आर्थिक वर्ष २०२२-२३ आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ मधील खेळत्या भांडवलावरील (नेहमीच्या निकषानुसार) व्याज निश्चित करताना एमवायटी विनियम २०१९ मध्ये नमूद केलेल्या सूत्राचा विचार केला आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील खेळत्या भांडवलावरील व्याज एपीएल तर्फे नेहमीच्याच निकषांनुसार निश्चित करण्यात आले आहे.

आर्थिक वर्ष २०२२-२३ आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ ची महसुली तूट / ( अधिक्य ) निश्चित करण्यासाठी, वीज शुल्काखेरीज मिळणारे प्रत्यक्ष उत्पन्न आणि ऊर्जा विक्रीमधून मिळणारा प्रत्यक्ष महसूल यांचा विचार केला आहे. तर आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी महसुली तूट /(अधिक्य) ठरवण्यासाठी वीज शुल्काखेरीज मिळणारे अंदाजे प्रत्यक्ष उत्पन्न आणि वीज विक्रीतून मिळणारा अंदाजे महसूल विचारात घेतला आहे.

२.४ आर्थिक वर्ष २०२२-२३ आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ यांची महसुली तूट /( अधिक्य ) तसेच आर्थिक वर्ष २०२४-२५ ची हंगामी महसुली तूट / (अधिक्य).

आर्थिक वर्ष २०२२-२३ च्या आर्थिक समायोजनाचा सारांश खालील तक्त्यात दाखवला आहे.

**तक्ता १ : आर्थिक वर्ष २०२२-२३ ची महसुली तूट / (अधिक्य)**

| तपशील / (रु. कोटींमध्ये) | एमटीआर आदेश | समायोजन केल्यावर |
|---|---|---|
| इंधनाशी संबंधित खर्च | १,३६१.३४ | १,३८९.८९ |
| पीएलएफ प्रोत्साहन | | २.३८ |
| परिचलन आणि देखभाल खर्च | १८९.१९ | २०२.१७ |
| वेतन फेररचना थकबाकी | | ३.७० |
| नॉन डीपीआर मधून संचालन आणि देखभाल खात्यात वर्ग केलेला खर्च | | ३.९६ |
| फेरनियोजन खर्च | ० | ०.०१ |
| घसारा खर्च | ३७.७६ | ३८.३२ |
| दीर्घकालीन कर्जावरील व्याज | १२.४३ | १३.२७ |
| आर्थिक शुल्क | ० | ०.१८ |
| खेळत्या भांडवलावरील कर्ज | २२.१८ | ३१.९५ |
| **एकूण महसुली खर्च** | **१,६२२.९०** | **१,६८५.८२** |
| अधिक : समभाग भांडवलावरील परतावा | १११.८४ | ११८.८८ |

| तपशील / (रु. कोटींमध्ये) | एमटीआर आदेश | समायोजन केल्यावर |
|---|---|---|
| वजा : बिगर वीजशुल्क उत्पन्न | १५.३० | १२.१३ |
| **एकूण महसुलाची आवश्यकता** | **१,७१९.४४** | **१,७९२.५८** |
| इंधन खर्चाच्या नियोजन कार्यक्षमतेची लाभ / (तोटा) विभागणी | | ३५.३४ |
| संचालन आणि देखभाल खर्चाच्या नियोजन कार्यक्षमतेची लाभ / (तोटा) विभागणी | | (५.३२) |
| खेळत्या भांडवलावरील व्याजाच्या नियोजन कार्यक्षमतेची लाभ / (तोटा) विभागणी | | (१०.५३) |
| **एकूण एआरआर** | | **१,८१२.०६** |
| | | |
| **महसूल** | | |
| वीजविक्रीचा महसूल - अचल शुल्क | ३३७.११ | ३३७.११ |
| वीजविक्रीचा महसूल - चल शुल्क | १,३६१.३४ | १,४६८.८६ |
| | | |
| **एकूण महसूली तूट/(अधिक्य)** | **२०.९९** | **६.०९** |

आर्थिक वर्ष २०२३-२४ साठीच्या आर्थिक समायोजनाचा सारांश खालच्या तक्त्यात दाखविला आहे.

**तक्ता २ : आर्थिक वर्ष २०२३-२४ ची महसुली तूट /(अधिक्य)**

| तपशील / (रु. कोटींमध्ये) | एमटीआर आदेशानुसार | समायोजन केल्यावर |
|---|---|---|
| इंधनाशी संबंधित खर्च | १,४७९.९१ | १,०७१.५० |
| परिचलन आणि देखभाल खर्च | १९८.३६ | २०१.२७ |
| वेतन फेररचना थकबाकी | ० | ०.८७ |
| फेरनियोजन खर्च | ० | ०.०१ |
| घसारा खर्च | ३८.२९ | ३१.२४ |
| दीर्घकालीन कर्जावरील व्याज | १०.७७ | ११.७६ |
| परकीय चलनाच्या दरातील फरक | ० | ४.५४ |
| अर्थविषयक शुल्क | ० | ०.२१ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | २३.८० | १६.८५ |

| तपशील / (रु. कोटींमध्ये) | एमटीआर आदेशानुसार | समायोजन केल्यावर |
|---|---|---|
| **एकूण महसुली खर्च** | **१,७५१.१३** | **१,३३८.२५** |
| अधिक : समभाग भांडवलावरील परतावा | ११३.२८ | १२२.०७ |
| वजा : बिगर दर उत्पन्न | १९.१५ | १०.८३ |
| **एकंदर महसुलाची गरज** | **१,८४५.२६** | **१,४४९.४९** |
| इंधन खर्चातील कार्यक्षमता (तोटा) / नफा यांचा वाटा | | २२.२९ |
| खेळत्या भांडवलावरील व्याजाच्या नियोजन कार्यक्षमतेची लाभ / (तोटा) विभागणी | | -०.४८ |
| **एकूण महसुलाची गरज (एआरआर)** | | **१,४७१.३०** |
| | | |
| **महसूल** | | |
| वीजविक्रीतून मिळालेला महसूल - अचल शुल्क | ३६५.३५ | ३६५.३५ |
| वीजविक्रीतून मिळालेला महसूल - चल शुल्क | १,४७९.९१ | १,०८८.८० |
| | | |
| **एकूण महसुली तूट /(अधिक्य)** | **०** | **१७.१५** |

आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील हंगामी आर्थिक समायोजनाचा सारांश खालील तक्त्यामध्ये दाखवला आहे.

**तक्ता ३ : आर्थिक वर्ष २०२४-२५ हंगामी महसुली तूट /(अधिक्य)**

| तपशील / (रु. कोटींमध्ये) | एमटीआर आदेशानुसार | आर्थिक वर्ष २०२४-२५ (अंदाजे) |
|---|---|---|
| इंधन विषयक खर्च | १,४४०.४८ | १,३३०.४४ |
| परिचलन आणि देखभाल खर्च | २०७.९८ | २१४.११ |
| नॉन-डीपीआर मधून संचालन आणि देखभाल खात्यात वर्ग केलेला खर्च | | २२.५८ |
| घसारा | ३८.९९ | ३०.३६ |
| कर्जावरील व्याज | ९.४९ | १०.६६ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | २४.०५ | २६.७३ |
| **एकूण महसुली खर्च** | **१,७२०.९९** | **१,६४७.२५** |
| अधिक : समभाग भांडवलावरील परतावा | ११४.९७ | ११४.२४ |

| तपशील / (रु. कोटींमध्ये) | एमटीआर आदेशानुसार | आर्थिक वर्ष २०२४-२५ (अंदाजे) |
|---|---|---|
| वजा : बिगर दर उत्पन्न | १९.१५ | १०.८३ |
| **एकूण एआरआर** | **१,८१६.८१** | **१,७५०.६६** |
| | | |
| **महसूल** | | |
| स्थिर शुल्क | ३७६.३३ | ३७६.३३ |
| उर्जा शुल्क | १,४४०.४८ | १,३३०,४४ |
| | | |
| **महसुली तूट/ (अधिक्य)** | **०** | **४३.८९** |

आर्थिक वर्ष २०२४-२५ पर्यंतची एकत्रित महसुली तूट / (अधिक्य) खालील तक्त्यात दाखविले आहे :

**तक्ता ४ महसुली तूट / (अधिक्य) आर्थिक वर्ष २०२४-२५ पर्यंत**

| तपशील | रु. कोटींमध्ये |
|---|---|
| आर्थिक वर्ष २०२२-२३ ची वाढीव महसुली तूट/(अधिक्य) | (१४.८९) |
| आर्थिक वर्ष २०२२-२३ ची वहन खर्च | (२.५१) |
| आर्थिक वर्ष २०२३-२४ ची महसुली तूट/ (अधिक्य) | १७.१५ |
| आर्थिक वर्ष २०२३-२४ ची वहन खर्च | ३.५६ |
| आर्थिक वर्ष २०२४-२५ ची हंगामी महसुली तूट | ४३.८९ |
| **एकूण** | **४७.२०** |

## ३. आर्थिकवर्ष २०२५-२६ ते आर्थिकवर्ष २०२९-३० पर्यंतचा एकूण आवश्यक महसूल

### ३.१ आर्थिकवर्ष २०२५-२६ ते आर्थिकवर्ष २०२९-३० पर्यंतचे परिचालनाचे मापदंड

एपीएल ने एमवायटी विनियम २०२४ नुसार, उष्णता दर, सहाय्यकारी वीज वापर, पारेषणातील तोटा, विशिष्ट इंधन वापर इत्यादी परिचलनाचे मापदंड विचारात घेतले आहेत. उपलब्धता निश्चित करण्यासाठी एपीएल ने, आर्थिक वर्ष २०२५-२६ पासून ते आर्थिक वर्ष २०२९-३० पर्यंतचे

एडीटीपीएस चा वार्षिक नियोजित बंद वीज पुरवठ्याचा काळ आणि अपेक्षित अनियोजित बंद वीज पुरवठ्याचा काळ विचारात घेतला आहे.

**३.२ आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० पर्यंतचा ऊर्जा आकार**

पुढील नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षाचा उर्जा आकार प्रस्तावित करण्यासाठी एपीएल ने प्रत्यक्ष जीसीव्ही तसेच मार्च २०२४ ते मे २०२४ पर्यंत ची इंधनाची प्रत्यक्ष किंमत विचारात घेतली आहे. कच्च्या कोळशापासूनच संपूर्ण वीजनिर्मिती विचारात घेतली आहे, कारण आयात कोळशाची किंमत पुष्कळ जास्त असून आयात कोळशाचा वापर केल्याने इंधनाचा खर्च वाढेल.

**३.३ आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० पर्यंतचे स्थिर आकार**

एपीएल ने, आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० पर्यंतचे स्थिर आकाराचे घटक, एमवायटी विनियम २०२४ नुसार निश्चित केले आहेत.

* आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० पर्यंतचे नियमित परिचलन व देखभाल खर्च, एपीएल ने एमवायटी विनियम २०२४ नुसार निश्चित केले आहेत.

* एडीटीपीएस च्या प्रकल्पाच्या सक्षम परिचालनासाठी आवश्यक असलेले आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० पर्यंतचे प्रस्तावित भांडवलीकरण, एपीएल ने विचारात घेतले आहे. एमवायटी विनियम २०२४ नुसार, एपीएल ने नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठीचा घसारा खर्च निश्चित केला आहे.

* कर्जावरील व्याज तसेच समभागांवरील परतावा (लागू असलेल्या कराच्या दरानुसार काढलेला), एमवायटी विनियम २०२४ नुसार, नियमित कर्ज समभाग गुणोत्तर विचारात घेऊन निश्चित केला आहे.

* आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० पर्यंतचे खेळत्या भांडवलावरील व्याज हे एमवायटी विनियम २०२४ नुसार नियमित पातळीवर निश्चित केले आहे.

⁎ एपीएल ने, आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० पर्यंतचे बिगर दर उत्पन्न, हे आर्थिकवर्ष २०२३-२४ च्या पातळीवरच प्रस्तावित केले आहे.

आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० पर्यंतच्या एडीटीपीएस च्या एकूण महसुलाच्या आवश्यक्तेचा सारांश खालील तक्त्यामध्ये दाखविला आहे.

**तक्ता ५ : आर्थिकवर्ष २०२५-२६ पासून ते आर्थिकवर्ष २०२९-३० पर्यंत एकूण महसुलाची आवश्यक्ता**

| तपशील/(रु.कोटींमध्ये) | आर्थिकवर्ष २०२५-२६ | आर्थिकवर्ष २०२६-२७ | आर्थिकवर्ष २०२७-२८ | आर्थिकवर्ष २०२८-२९ | आर्थिकवर्ष २०२९-३० |
|---|---|---|---|---|---|
| इंधनविषयक खर्च | २,०२३.३९ | १,९८१.७५ | २,०८२.७३ | २,२०९.६० | २,२०१.२५ |
| परिचालन आणि देखभाल खर्च | २३५.४४ | २४६.७९ | २५८.७६ | २७१.३९ | २८४.७० |
| घसारा खर्च | ३४.४७ | ४०.९९ | ४९.१० | ५४.६६ | ५७.८० |
| कर्जाऊ भांडवलावरील व्याज | १३.५० | २०.०९ | २७.२७ | ३२.२० | ३३.०० |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | ६०.३६ | ६१.६० | ६४.१७ | ६६.५४ | ६८.४७ |
| समभागांवरील परतावा | १३१.५६ | १४०.३२ | १५०.१७ | १५८.६३ | १६३.८४ |
| उणे : बिगर दर उत्पन्न | १०.८३ | १०.८३ | १०.८३ | १०.८३ | १०.८३ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **निव्वळ एकूण आवश्यक महसूल** | **२,४८७.८९** | **२,४८०.७०** | **२,६२१.३६** | **२,७८२.१९** | **२,७९८.२३** |
| आर्थिकवर्ष २०२४-२५ पर्यंतची महसुलाची तूट | ४७.२० | | | | |
| **एकूण एआरआर** | **२,५३५.०९** | **२,४८०.७०** | **२,६२१.३६** | **२,७८२.१९** | **२,७९८.२३** |

**४ मागण्या -**

मा. आयोगासमोर एपीएल च्या खालील मागण्या आहेत.

१. सादर केलेला ही याचिका दाखल करून घेण्यात यावी.

२. आर्थिक वर्ष २०२२-२३ तसेच आर्थिक वर्ष २०२३-२४ चे आर्थिक समायोजन केल्यानंतर येणारी प्रत्यक्ष महसुली तूट / (अधिक्य) व त्याचबरोबर या अर्जात निश्चित केलेला आर्थिकवर्ष २०२५-२६ पर्यंतचा वहन / धारण खर्च यांना मंजुरी देण्यात यावी.

३. याचिकेत निश्चित करण्यात आलेला, आर्थिक वर्ष २०२४-२५ साठीचा हंगामी एआरआर आणि महसुली तूट / (अधिक्य) यांना मंजुरी देण्यात यावी.

४. या याचिकेत अंदाजित केलेल्या, आर्थिक वर्ष २०२५-२६ पासून ते आर्थिकवर्ष २०२९-३० पर्यंतच्या एकूण आवश्यक महसुलाला मंजुरी द्यावी.

५. याचिकेत निश्चित केलेली आर्थिकवर्ष २०२४-२५ पर्यंतची एकत्रित महसुली तूट/अधिक्य ही, आर्थिकवर्ष २०२५-२६ साठीच्या एकूण आवश्यक महसूलात समाविष्ट करून, ती तूट/ अधिक्य वसूल करण्यास मंजुरी द्यावी.

६. अर्जात मागण्या केल्या असतील तेथे एमवायटी विनियम २०१९ मधून तसेच एमवायटी विनियम २०२४ मधून विशिष्ट मुद्द्यांपुरती सूट द्यावी.

७. वीज दरासंबंधीच्या आधीच्या आदेशातून सूट देण्याच्या किंवा त्याचा पुनर्विचार करण्याच्या विशिष्ट मागण्या याचिकेत केल्या असल्यास त्या मान्य कराव्यात.

८. भविष्यात गरज भासल्यास अर्जात बदल करण्यास किंवा त्यात जादा मुद्दे समाविष्ट करण्यास किंवा त्यात दुरुस्त्या करण्यास, बदल करण्यास परवानगी द्यावी.

९. अर्जात अनावधानाने झालेल्या काही चुका, विसंगती, राहून गेलेल्या बाबी, आकडेवारीतील किरकोळ चुका क्षमापित कराव्यात.

१०. आयोगाला योग्य वाटेल त्यानुसार अन्य मागण्या मान्य कराव्यात तसेच अन्य आदेश किंवा सूचना द्याव्यात.

अर्जदारांची आयोगाला विनंती आहे की, वरील मागण्या विचारात घेऊन त्या मान्य कराव्यात आणि आम्हाला सुयोग्य दिलासादायक आदेश द्यावेत.

स्थळ - मुंबई.

तारीख - ०२.०१.२०२५

अक्षय माथुर

अधिकृत प्रतिनिधी

अदाणी पॉवर लि.